महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सअॅप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : दुसरे | अंक : १८६ वा | दिनांक : ०६/०५/२०२५ | वार : मंगळवार

# महादेव जानकर काँग्रेससोबत जाणार



**मुंबई :** राष्ट्रीय समाज पक्षाचे अध्यक्ष महादेव जानकर यांनी सोमवारी काँग्रेस नेते तथा लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांची भेट घेतली. यावेळी त्यांनी त्यांना पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या ३०० व्या जयंती महोत्सवाचे निमंत्रण दिले. सूत्रांच्या माहितीनुसार, यावेळी दोन्ही नेत्यांत बराच वेळ चर्चा झाली. त्यामुळे भाजपवर नाराज असणारे महादेव जानकर काँग्रेससोबत जाणार का? अशी चर्चा राजकीय वर्तुळात सुरू झाली आहे.

महादेव जानकर यांनी गतवर्षी लोकसभा निवडणुकीच्या तोंडावर महाविकास आघाडीत येण्याचे संकेत दिले होते. या प्रकरणी त्यांची राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांच्याशी कथितपणे बोलणेही झाले होते. त्यानंतर त्यांना माढा लोकसभा मतदारसंघातून उमेदवारी देण्याचेही जवळपास निश्चित झाले होते. पण ऐनवेळी महादेव जानकर यांनी महाविकास आघाडीला झटका देत भाजप प्रणित महायुतीसोबत जाण्याचा निर्णय घेतला. यामुळे महाविकास आघाडीची घोर निराशा झाली. त्यानंतर आता त्यांनी काँग्रेस नेते राहुल गांधी यांची भेट घेतल्यामुळे ते पुन्हा एकदा महाविकास आघाडीच्या गोटात येण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

महादेव जानकर यांच्या पक्षाने ३१ मे रोजी नवी दिल्ली स्थित तालकटोरा स्टेडियममध्ये पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या ३०० व्या जयंती महोत्सवाचे आयोजन केले आहे. या कार्यक्रमाचे निमंत्रण देण्यासाठी त्यांनी सोमवारी राहुल गांधी यांची भेट घेतली. काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी एका पोस्टद्वारे या भेटीची माहिती दिली. राष्ट्रीय समाज पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष महादेव जानकर यांनी आज दिल्ली येथे लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांची भेट घेतली. यावेळी त्यांनी त्यांच्याशी विविध मुद्यांवर चर्चा करून पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या ३०० व्या जयंती महोत्सवाचे निमंत्रण दिले, असे ते म्हणाले.

हर्षवर्धन सपकाळ यांनी राहुल गांधी व महादेव जानकर यांच्या भेटीची माहिती सार्वजनिक केल्यानंतर महाराष्ट्राच्या राजकारणावर बारीक लक्ष ठेवून असणाऱ्या राजकीय विश्लेषकांच्या भुवया उंचावल्या आहेत. कारण, महादेव जानकर यांनी गतवर्षी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या नेतृत्वातील राष्ट्रवादी काँग्रेसच्या कोट्यातील परभणीच्या जागेवर निवडणूक लढवली होती. पण त्यांचा ठाकरे गटाच्या उमेदवाराने दारुण पराभव केला होता. त्यानंतर झालेल्या विधानसभा निवडणुकीत त्यांनी महायुतीपासून चारहात लांब राहणे पसंत केले होते. त्यानंतर आता त्यांनी राहुल गांधी यांची भेट घेतल्यामुळे त्यांचा कल महाविकास आघाडीच्या बाजूने वाढल्याचा दावा केला जात आहे. दरम्यान, महादेव जानकर सत्ताधारी महायुतीसोबत राहणे पसंत करतात की काँग्रेस प्रणित इंडिया आघाडीत समाविष्ट होतात हे पाहणे औत्सुक्याचे ठरणार आहे.

# कोण कोणाला गिळत आहे कळेल : अशोक चव्हाण



**नांदेड :** महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री अशोक चव्हाण हे काँग्रेस पक्षातील महत्त्वाचे नेते होते. त्यांनी जवळपास अर्धशतक काँग्रेसमध्ये घालवले आहे. आता ते भाजपमध्ये आहेत. ५० वर्ष काँग्रेसमध्ये घालवल्यानंतर आता अशोक चव्हाण काँग्रेसवर टीका करताना पाहायला मिळतात. काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केलेल्या विधानावर अशोक चव्हाण यांनी पलटवार केला आहे.

एका वृत्तवाहिनीशी बोलताना अशोक चव्हाण यांनी हर्षवर्धन सपकाळ यांच्या विधानावर प्रतिक्रिया देताना टीका केली आहे. हर्षवर्धन सपकाळ अजून नवीन आहेत. त्यांना बराच अनुभव घ्यायचा आहे. मी पन्नास वर्ष काँग्रेसमध्ये काम केले. कोण कोणाला गिळत आहे याचा अनुभव मी घेतलेला आहे. नवीन अध्यक्ष असल्याने त्यांना गिळल्यावर लक्षात येईल की कोण कोणाला गिळत आहे.

पुढे बोलताना अशोक चव्हाण म्हणाले, एखादा पक्ष प्रादेशिक असो किंवा राष्ट्रीय, ज्या पक्षाशी जनतेचा संपर्क असतो तो पक्ष कधीही संपू शकत नाही. दक्षिणेत आजही प्रादेशिक पक्षाचे मोठे अस्तित्व आहे. मीही पन्नास वर्षे काँग्रेसमध्ये होतो. त्यामुळे त्या पक्षात अधोगतीविषयी बोलणे मला योग्य वाटत नाही. मी माझी दिशा स्वीकारली आहे. मी आहे त्या ठिकाणी समाधानी आहे, असेही ते म्हणाले.

भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी काँग्रेसला फोडा आणि रिकामी करा, असे विधान केले होते. पुण्यातील भाजप पदाधिकाऱ्यांच्या बैठकीत ते बोलत होते. त्यांच्या विधानावर हर्षवर्धन सपकाळ यांनी टीका केली होती. ते म्हणाले, भाजप ही काँग्रेसचे नेते खाणारी चेटकीण आहे. आता या चेटकिणीचे पोट नेते खाऊन भरलेले नाही. आता ही चेटकीण काँग्रेसचे कार्यकर्ते खायला निघाली आहे, असे मी म्हणालो होतो. आता चंद्रशेखर बावनकुळे यांच्या विधानातून ते सिद्ध होत आहे, असे हर्षवर्धन सपकाळ म्हणाले होते.

चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले, काँग्रेसला लोक सोडून चालली आहेत. संग्राम थोपटे यांनी सगळे काँग्रेसला दिले तरी सुद्धा त्यांना पक्ष सोडावा लागला. त्यांना त्यांच्या पक्षाकडून, राहुल गांधी यांच्याकडून अपेक्षा नाहीत. कुठले ही धोरण काँग्रेसला नाही. जो जो काँग्रेस किंवा इतर पार्टी मधून आमच्याकडे येईल त्याचे स्वागत आहे. काँग्रेसला फोडा, काँग्रेसला रिकामी करा. तुम्ही थकून जाल इतके जण आमच्याकडे येत आहेत. काँग्रेसची लोक आपल्याकडे आली तरी तुमचा आधी विचार करणार, असे आश्वासन बावनकुळे यांनी भाजप पदाधिकाऱ्यांना दिले.



**महाराष्ट्र जनशक्ती**

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), मंगळवार ०६ मे २०२५

## छत्रपती संभाजीनगरची कू.सयेशा गरंडे हिचे राष्ट्रीय संरक्षण अकादमी (NDA) परीक्षेत यश




**पडेगाव (शिवाजी गायकवाड)** छत्रपती संभाजी नगर येथिल National Academy of Defense and Allied Services (NADAS), छावणी, छत्रपती संभाजीनगर,ची कू.सयेशा गरंडे हिने राष्ट्रीय संरक्षण अकादमी (NDA) २०२५ परीक्षा यशस्वीरित्या उत्तीर्ण करत आपल्या कुटुंबाचा आणि प्रशिक्षण संस्थेचा मराठवाड्यात नाव लौकिक केले आहे.

संस्थेचे संचालक डॉ. विजय जाधव, प्राज्ञा इंगळे, रवी राजपूत , प्रा, सुनील वाकेकर,एड. विजय वानखेडे,अकिल शहा ,अनिरुद्ध पवार,डॉ. नाझनीन खान तसेच शिक्षकवर्ग व संपूर्ण टीम यांचे तिला मोलाचे योगदान लाभलेले आहे. त्यांनी सयेशाला कठोर प्रशिक्षण करत मार्गदर्शन आणि प्रेरणा दिली.

सयेशाच्या आई-वडिलांनी तिच्या यशानंतर NADAS संस्थेचे विशेष आभार मानले आहेत. त्यांनी सांगितले, "सयेशाच्या या यशामागे नडास चे शिस्तबद्ध आणि दर्जेदार प्रशिक्षण हेच मुख्य कारण आहे. आम्ही संस्थेचे मन:पूर्वक आभार मानतो."अशा शब्दात त्यांनी विचार व्यक्त केले.NADAS ही NDA, CDS, AFCAT आणि SSB मुलाखतींसाठी राज्यातील अग्रगण्य प्रशिक्षण संस्था मानली जाते.

## डॉ. नितिन गायकवाड़ यांना राष्ट्रीय जीवन गौरव पुरस्कार प्रदान




**छत्रपती संभाजीनगर :** प्रा. डॉ. नितिन गायकवाड़ यांना छत्रपती संभाजीनगर येथील समग्र सोशल फाऊंडेशनकडून राष्ट्रीय जीवन गौरव पुरस्कार प्रदान करण्यात आहे. रविवारी, ४ मे रोजी यशवंतराव चव्हाण नाट्यगृह, छत्रपती संभाजीनगर येथे विशेष कार्यक्रमात त्यांना हा पुरस्कार देवून सन्मानित करण्यात आले.

विधान परिषद सदस्य आमदार शिरीष केणेकर, शिक्षणतज्ञ एस. पी. जवळकर आदींच्या हस्ते हा पुरस्कार डॉ नितिन गायकवाड यांना त्यांच्या उत्कृष्ट सामाजिक, शैक्षणिक कार्यासाठी देन्यात आला.

सदरिल पुरस्कार प्राप्त झाल्या बद्दल डॉ नितिन गायकवाड यांचे एकंबा ग्रामस्थ व परमेश्वर ट्रस्ट एकंबा व मित्र परिवारा कडून त्यांचे अभिनंदन करन्यात आले.

# अतनुर ता. जळकोट येथे ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण व अखंड हरिनाम सप्ताहाची सांगता









**अतनूर (प्रा. सुधीर पंचगल्ले) :** महाराष्ट्र ही संतांची भूमी आहे. म्हणून या भूमीला खऱ्या अर्थाने संत परंपरेच अनुष्ठान लाभलं आहे. संत परंपरेमुळे महाराष्ट्राला मोठा वारसा लाभला आहे. याच माध्यमातून हा वारकरी संप्रदाय खऱ्या अर्थाने संपूर्ण जगभरात पोहोचायला मदत झाली. संत ज्ञानेश्वर, संत एकनाथ, संत गोरा कुंभार, संत चोखामेळा, संत जनाबाई, संत तुकाराम, संत नामदेव, संत निवृत्तीनाथ, संत मुक्ताबाई, संत सावता माळी, संत सोपानदेव यांच्यासोबतच अनेक संतांनी आपल्या अभंगातून, निरुपणातून समाजाला एक सकारात्मक दिशा देण्याच काम केलं. अतनुर येथे श्री संजीवन समाधी असलेले घाळेप्पा स्वामी महाराज यांच्या नांवाने हा अखंड हरिनाम सप्ताह असतो.

संजीवन समाधी म्हणजे एका व्यक्तीने स्वतःच्या इच्छेने, खोल ध्यान अवस्थेत प्रवेश करून, आपल्या शारीरिक देहाचा त्याग करणे. याला अनेकदा 'जिवंत समाधी' देखील म्हटले जाते, कारण व्यक्ती जिवंत असतानाच या अवस्थेत प्रवेश करतो. संजीवन समाधी घेणाऱ्या व्यक्तीचा आत्मा आणि शरीर हे एका विशिष्ट स्थितीत प्रवेश करतात, जिथे ते पूर्णपणे विलीन होतात. संजीवन समाधी घेतलेले श्री घाळेप्पा स्वामी महाराज यांची १४९ वी पुण्यतीथी साजरी करण्यात आली. ज्या घाळेप्पा स्वामी महाराज जिवंत समाधी घेतल्यानंतर पुर्ण एक वर्षानंतर समाधी काढण्यात आली तेव्हा त्यांचा डावा डोळा ऊघडा होता.

तसेच समाधी घेते वेळी लावलेला दिवा एक वर्षानंतही तेवत होता. यावरुन संजिवन समाधिस्थ श्री घाळेप्पा स्वामी महाराजांचे देवत्व सिध्द होते. यामुळेच अतनूर पंचक्रोशी मधे श्री घाळेप्पा स्वामी महाराजाचे संतत्व आहे. महाराज नवसाला पावणारे,संकट समयी भक्ताला मदत करणारे अशी गाढ श्रद्धा आहे. महाराजाचा पुजनीय वार सोमवार आहे.

श्रावण महिन्यात श्री घाळैप्पा स्वामी महाराज फक्त बेलपत्री खाऊनच अनुष्ठाण करत असत म्हणुनच की काय महाराजाना दुध साखरेचा नैवेद किंवा दुधातील दशमीचा नैवैद दाखवला जातो.वारकरी संप्रदायामध्ये अखंड हरिनाम सप्ताहाला मोठे महत्त्व आहे. यामध्ये सात दिवस विविध प्रकारचे संत वाङ्मयाचा अभ्यास करणाऱ्या हरिभक्त परायण महाराजांकडून संत ज्ञानेश्वरांपासून संत तुकाराम पर्यंत विविध संतांच्या रचना असलेल्या अभंगावर तत्वचिंतन मांडण्यात येते. ज्याद्वारे मनुष्य जन्मात ईश्वर नामाचे विशद केले जाते.वैशाख प्रतिपदा १ ते वैशाख शुद्ध सप्तमी पर्यंत अखंड हरिनाम सप्ताहाचा समारोप सोमवारी नवनाथ महाराज डोंगरशैळकीकर महाराजाच्या काल्याच्या किर्तनाने करण्यात आला.

जळकोट तालुक्यातील अतनुर येथे अखंड हरिनाम सप्ताहाची सांगता हजारो जनसागराच्या साक्षीने भक्तिमय वातावरणात झाली. अतनुर येथे अखंड हरिनाम सप्ताह भक्तिमय वातावरणात गेली सात दिवस सुरू होता. या सात दिवसांमध्ये दररोज भजन व पहाटे पाच वाजता काकड आरती होत होती. या सप्ताहाची बुधवारी ज्ञानेश्वर माऊलीच्या पालखीची गावात पायी दिंडी व शोभायात्रा काढण्यात आली. पायी दिंडी व शोभायात्रा मुख्य बाजार रस्त्यावरुन अंबाबाई मंदीर मार्गे बस स्टॅड मार्गे पाटलाच्या ईनामातुन कुंभार गल्ली,शाळेच्या मैदान अशी परिक्रमा करून भजनी मंडळीच्या हरिनामाच्या गजरात ढोल ताशाच्या निनादात व फटाक्याच्या आतिषबाजीत संपूर्ण गावातफिरून पायी दिंडी व शोभायात्रा परत शेवटी श्री काशी विश्र् वनाथ महाराज व संजीवन समाधी श्री घाळेप्पा स्वामी महाराज यांच्या पवित्र देवस्थान असणाऱ्या मंदिरात आली.

पायी दिंडी व शोभायात्रा निघाली असता यात बालगोपालांसह टाळकरी महिला पुरुषांनी टाळमृदुंगाच्या आवाजावर फुगडीचा ठेका धरला. ज्ञानदेव तुकाराम च्या गजरात संपूर्ण परिसर मंत्रमुग्ध झाला होता. सात दिवस चाललेल्या अखंड हरिनाम सप्ताहाची ह.भ.प. श्री नवनाथ महाराज डोंगरशेळकीकर यांच्या काल्याच्या कीर्तनाने सांगता झाली. व नंतर लगेच अन्नदाते केशव पाटील,सुर्यकांत पांचाळ व प्रा.शशिकांत बिचकुंदे यांच्या कडुन ठेवणण्यात आलेल्या महाप्रसादाला सुरुवात झाली. या महाप्रसादाचा लाभ अतनुर परिसरातील हजारो भाविक भक्तांनी घेतला.

अशाप्रकारे गेल्या सात दिवसापासून सुरू असलेल्या सप्ताहाच्या सांगतेने शहर हरिनामाच्या गजरात, ढोलताशांच्या व फटाक्यांच्या अतिषबाजीने अक्षरक्षः दुमदुमले होते.या सप्ताहचे वैशिष्ट म्हणजे मंदिरासाठी मंदिराशेजारीच खाजगी खुली जागा खरेदी करण्यात आली. त्यामुळे भक्ताकडुन पंचकमिटीचे कौतुक होत आहे.

या सप्ताह यशस्वितेसाठी कमिटी अध्यक्ष विकास सोमुसे,ऊपाध्यक्ष गोविंद पाटील येवरे, हभप दयानंद स्वामी, प्रकाश पोलीस पाटील, चंद्रकांत जोशी गुरुजी, नामदेव कोकणे, माधव सोमूसे, सुर्यकांत पांचाळ, किसन मुगदळे, नामदेव कोकणे, चंद्रकांत जोशी, खजिनदार बाबु पंचगल्ले गुरूजी, माणिक सांळुके.,दिलीप कोकणे, प्रमोद संगेवार, बाळु कोडगीरे, अशोक पाटील माजी सभापती कृषी ऊत्पन्न बाजार समिती, ऊदगीर, मारुती गुंडीले, श्रीधर पाटील गव्हाणे, श्रीमती मन्याबाई मधुकर पत्तेवार, पत्रकार संजय शिदे या सर्वांनी सप्ताह यशस्वी पार पाडण्यासाठी गेली दोन महिने मोलाचे योगदान व सहकार्य केले.

मंदिरावर पुजेची व्यवस्थापक म्हणुन बाबु कदम, बाबु साकोळकर,गुरुनाथ कापसे यांनी मोलाचे सहकार्य केले.तसेच अन्य काही मंडळीनी आपल्या दिलेली जबाबदारी चोख पार पाडली म्हणुन श्री काशी विश्र् वनाथल महाराज मंदिर संमिती तर्फे त्यांचा सत्कार करण्यात आला

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), मंगळवार ०६ मे २०२५


## जनसहयोग संस्थेच्या देशी वृक्षारोपण बँक व वनास अजित दादांची भेट



**पडेगाव (शिवाजी गायकवाड)** येथिल शेळी व मेंढी पालन केंद्रा च्या मागील ओसाड जमिनीवर जनसहयोग संस्थेच्या वतीने दुर्मिळ वनौषधी तथा देशी वृक्षाचे वन तयार केले त्याला महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री ना. अजित पवार यांनी भर दुपारी २ वाजता भेट देऊन दुर्मिळ वन औषधी तथा देशी वृक्ष बँकेचे उदघाटन करत भेट देऊन जनसहयोग संस्थेचे अभिनंदन केले.

यावेळी त्यांच्या समवेत आमदार सतीश चव्हाण, विक्रम काळे आदींची प्रमुख उपस्थिती होती. दुर्मिळ होत चाललेल्या देशी झाडांचे संगोपन होणे खूप महत्वाचे आहे. ती झाडें वनस्पती जोपासायला हवी असे प्रतिपादन अजित दादा पवार यांनी पडेगाव येथे केले.येथे कार्यरत असलेल्या महिला यांनी दादांना उद्देशून आमचा भाऊ आला अशी प्रतिक्रिया दिली. यावेळी दादांनी लाडकी बहिणीचे पैसे मिळाले का असा प्रश्न ही येथिल महिलांना केला. महिला खूप खूष झाल्या व दादांना आशिर्वादही दिला. अजित दादांनी येथिल महिलांचा सत्कार स्वीकारून करीत असलेल्या कार्याबद्दल समाधान व्यक्त केले.

## पडेगाववासीयांच्या वतीने सेवानिवृत्त सैनिकाचा सेवागौरव





**पडेगाव (शिवाजी गायकवाड) :** येथिल सैनिक दिनांक ३० एप्रिल बुधवार रोजी श्री सतीश बाबुराव कात्रे यांची भारतीय सैन्यातून वीस वर्ष देश सेवा पूर्ण करून सेवानिवृत्त झाल्याबद्दल पडेगाव येथे भव्य मिरवणूक काढण्यात आली व त्यांचा भव्य सत्कार समारोह कार्यक्रम करण्यात आला सेवानिवृत्ती बद्दल पडेगाव वासियांच्या वतीने सेवागौरव करण्यात आला.

सर्वप्रथम गावातील महात्मा ज्योतिबा फुले सावित्रीबाई फुले यांना हार व पुष्प अर्पण करून त्यानंतर छत्रपती शिवाजी महाराजांना हार व पुष्प अर्पण करून सुरुवात झाली पडेगावातील संपूर्ण परिसरामध्ये ठीक ठिकाणी त्यांचे स्वागत करण्यात आले.सायंकाळी सहा वाजेपासून ते नऊ वाजेपर्यंत मिरवणूक फेरी पडेगाव परिसरामध्ये संपन्न झाली.

यावेळी, पडेगाव गावकरी मंडळी, श्री अशोक नाना आमले, अशोक हंगे, व माजी सैनिक मोठया संख्येने उपस्थित होते. यावेळी श्री अशोक हंगे तसेच श्री अशोक आमले,त्यांचे वडील श्री बाबुराव कात्रे तसेच छगनराव कात्रे हेही भारतीय सैन्यात सेवारत होते. व यांचे लहान बंधू सध्या भारतीय सैन्यात सेवारात आहे.

## ओबीसी टक्केवारी वाढली तर घटनात्मक पेच निर्माण होणार ! - डॉ. राजेंद्र दाते पाटील



**मुंबई :** महाराष्ट्रा मध्ये, बांठिया आयोग ही एक विशेष समिती होती जी ओबीसी आरक्षणा संदर्भात अहवाल देण्यासाठी स्थापन करण्यात आली होती.या आयोगाचे अध्यक्ष जयंत कुमार बांठिया होते, जेपूर्वीचे मुख्य सचिव होते.आता आयोगाच्या शिफारशी आणि समितीच्या शिफारशी यास घटनात्मक स्वरूप आहे.जात निहाय जनगणनेत जर ओबीसी टक्केवारी वाढली तर घटनात्मक पेच निर्माण होणार असल्याचे स्पष्ट मत पीपल्स फोरम फॉर सोशल कॉजचे सचिव आणि आरक्षणाचे जेष्ठ अभ्यासक ड राजेंद्र दाते पाटील यांनी आमच्या प्रतिनीधी सोबत व्यक्त केले.पुढे ते बोलतांना म्हणाले की, न्यायमूर्ती रोहिणी आयोगाचा अहवाल चार गटात विभाजन केले त्यात फायदा होईल किंवा नाही या पेक्षा जास्त विचार करणे महत्वाचे ठरेल की इंद्रा सहानी प्रकरणाचे ५० टक्केची मर्यादा परत आडवी येऊन समस्या निर्माण होणार असल्याची बाब आम्ही सतत पुढे केल्या मुळे जात निहाय जनगणना साठी प्रचंड मोठे मनुष्यबळ लाखो करोड रुपयांची व्यवस्था कशी आणि कुठल्या हेड मधुन करणार हा मागील अनुभव पहाता हे महत्वाचे ठरणार असुन यासाठी किती वेळ लागेल याचे सुद्धा वेळेची निश्चिती असलेला म्हणजे टाईम बॉंड प्रोग्राम जाहीर होणे आवश्यक आहे.आता यामुळे प्रगत जात बाहेर काढण्यासाठी प्रयत्न केला जाईल आणि त्यात अनेक जातींचे नुकसान होणार आहे कारण जनगणना जरी झाली तरी त्याचा वाटप करायचा ठरले तर ते कसे ठरवणार ? हा मोठा प्रश्न असुन इंद्रा सहानी प्रकरणा तील ५०% मर्यादा घटनादुरूस्ती केल्या शिवाय ओलांडता येणार नाही मग जनगणना अहवाल फक्त " रिपोर्ट "पुरता मर्यादेत राहील म्हणुन घटनात्मक तरतुद केल्या शिवाय ओबीसी आरक्षणाचे प्रमाण वाढवता येणार नाही. एस सी एस टी यात येणार नसल्यामुळे जेष्ठ अभ्यासक राजेंद्र दाते पाटील यांनी गेली अनेक वर्षापासून मागणी केली होती की,घटना दुरूस्ती केल्या शिवाय आरक्षण मर्यादा वाढवणे शक्य होणार नसल्यामुळे इंद्रा सहानीची ५० टक्के मर्यादा ओलांडण्यासाठी पहिल्यांदा घटनादुरूस्ती केल्या शिवाय आरक्षणाच्या प्रतीक्षेत असलेल्या कोणालाही लाभ होणार नाही असे अगदी स्पष्ट मत जेष्ठ अभ्यासक डॉ राजेंद्र दाते पाटील यांनी नमुद करुन त्यांना अत्यंत किचकट आणि अभ्यासु माहिती देताना नमुद केले की, आयोगाचे मुख्य कार्य: स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीत ओबीसी आरक्षण लागू करण्यासाठी आवश्यक माहिती आणि डेटा गोळा करणे.ओबीसी आरक्षणाचे सामाजिक - आर्थिक आणि शैक्षणिकदृष्ट्या मागासलेल्या घटकांवर काय परिणाम होतो, याचा अभ्यास करणे.ओबीसी आरक्षणा संदर्भात कायदेशीर आणि तांत्रिक बाबींचा अभ्यास करणे.ओबीसी आरक्षण लागू करण्यासाठी राज्य सरकारला शिफारशी करणे. आयोगाचा अहवाल: आयोगाने आपला अहवाल राज्य सरकारला सादर केला, ज्यामध्ये ओबीसी आरक्षणा साठी २७ % आरक्षण देण्याची शिफारस करण्यात आली होती. हाअहवाल राज्य सरकारने स्वीकारला आणि ओबीसी आरक्षणाचे योग्य नियोजन करण्या साठी राज्य सरकारने योग्य कार्यवाही केली.ओबीसी समुदायाच्या राजकीय आरक्षणा बाबत एक महत्त्वाची सुनावणी सुप्रीम कोर्टात झाली माजी मुख्य सचिव जयंतकुमार बांठिया आयोगाचा अहवाल स्वीकारुन न्यायालय स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकी साठी २७ टक्के ओबीसी आरक्षण मान्य करणार होते काय ? याकडे महाराष्ट्रासह संपूर्ण देशाचं लक्ष लागले होते.जयंत बांठिया यांचा अहवाल राज्य सरकारने सुप्रीम कोर्टात सादरही केला होता. ओबीसींच्या राजकीय आरक्षणा साठी सुप्रीम कोर्टानं ज्या ट्रिपल टेस्टची पूर्तता करायलासांगितले होते, त्याच आधारावर प्रत्येक स्थानिक स्वराज्य संस्था निहाय हा रिपोर्ट असल्याचा सरकारचा दावा झाला होता आहे. जयंत बांठीया अहवाला तील महत्त्वाचे मुद्दे : राज्य सरकारने दिनांक ११ मार्च २०२२ रोजी स्थानिक स्वराज्य संस्थेतील इम्पिरिकल डेटा मिळवण्यासाठी जयंतकुमार बांठीया यांच्या अध्यक्षतेखाली कामकाज सुरू केले.जयंत बांठीया यांनी आपला अहवाल व शिफारशी ७ जुलै २०२२ रोजी सरकारला सादर केला. जयंत बांठीया यांनी आपल्या शिफारशी मध्ये ओबीसी हे नागरिकांचा मागासवर्ग या सदरात मोडत असून ते राजकीय मागास असल्याचे शिफारशीत सांगितले आहे.मतदार यादीनुसार सर्वे रिपोर्ट म्हणजे जनगणना अहवाल प्रमाणे इतर मागासवर्गीयांची लोकसंख्या ३७ टक्के असल्याचे अनुमानित करण्यात आले. राज्यामध्ये एकूण जनसंख्या जरी ३७ टक्के दाखविण्यात आली असली तरी स्थानिक स्वराज्य संस्थां मध्ये ही लोक संख्या वेगवेगळी दर्शविण्यात आली आहे.ज्या स्थानिक स्वराज्य संस्थां मध्ये एससी/एसटीची लोक संख्या ५० टक्के असेल, त्या ठिकाणी ओबीसींना आरक्षण असणार नाही. याच्या परिणामी गडचिरोली, नंदूरबार आणि पालघर जिल्हा परीषद मध्ये ओबीसी आरक्षण शून्य टक्के असणार होते. जयंत बांठीया यांनी सर्वत्र ओबीसींना २७ टक्के आरक्षण देण्याची शिफारस केली आहे. हे आरक्षण देत असताना अनुसूचित जाती/अनुसूचित जमाती आणि ओबीसी यांची सदस्य संख्या ५० टक्क्यांहून अधिक होऊ नये अशी अट आहे. त्यामुळे पुर्वी रद्द झालेल्या ९२ नगर परिषदा आणि नगर पंचायतीं सह ३६७ स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुका घेण्याचा मार्ग मोकळा झाला होता.जयंत बांठिया यांच्या शिफारसी नुसार ज्या ठिकाणी अनुसूचित जमातींची संख्या५० टक्क्यांपेक्षा जास्त असेल, तिथे ओबीसी आरक्षण दिले जाणार नाही.मंडल आयोगाने राज्या तील ओबीसींची लोकसंख्या ५४ टक्के निश्चित केली होती.त्यानुसार महाराष्ट्रात २७ टक्के ओबीसी आरक्षण लागू करण्यात आले होते.मात्र जयंत बांठिया अहवाला नुसार ३७ टक्के ओबीसी दाखवण्यात आलेत. त्यामुळे १७ टक्के ओबीसी गेले कुठे ? असा प्रश्नही निर्माण झालाय. जयंत बांठिया अहवालात काय ? राज्याचे माजी मुख्य जयंतकुमार बांठिया यांच्या अध्यक्षते खाली ११ मार्च २०२२ रोजी तत्कालिन मविआ सरकारकडून स्थापना ७ जुलै २०२२ रोजी राज्य सरकारला अहवाल सादर राज्यात ओबीसींची लोकसंख्या ३७ टक्के २७ टक्के राजकीय आरक्षण देण्याची शिफारस प्रत्येक नगर पालिका क्षेत्रात ओबीसींचं वेगवेगळं प्रमाण एससी, एसटी आरक्षणाला धक्का न लावता आरक्षण एकूण आरक्षणाची ५० टक्क्यांची मर्यादा कायम अनुसूचित जमातींची लोक संख्या ५० टक्क्यां पेक्षा अधिक असेल तर ओबीसी आरक्षण नाही तात्कालीन माहिती कशी गोळा केली ? जयंत बांठिया यांनी ग्रामविकास विभागाचे सचिव,उपसचिव, विभागीय आयुक्त,विविध राजकीय पक्षांचे नेते तसेच जिल्हाधिकारी, यांच्याशी चर्चा केली. तसेच वर्तमानपत्रां मध्ये जाहिराती देऊन जनतेची मते मागवण्यात आली. त्यानंतर आयोगासमोर ६ जनसुनावण्या झाल्या.आयोगाला एकूण १५७१ निवेदने प्राप्त झाली होती. आधीची ओबीसी आकडेवारी यापूर्वी विविध आयोग आणि संस्थां मार्फत राज्यात ओबीसींची गणना करण्यात आली होती. त्यात किमान २७ टक्के तर कमाल ४० टक्के ओबीसी आढळून आले होते. . ग्रामीण भागात ओबीसींची जितकी घरे आहेत, ती संख्या ग्राह्य धरून राष्ट्रीय सांख्यिकी मध्ये ओबीसींचे प्रमाण ३९.७ टक्के दाखवण्यात आले होते. ही आकडेवारी २०१९ मधील आहे.'सरल' या संस्थेने गोळा केलेल्या आकडेवारीनुसार राज्यात ३२.९३ टक्के ओबीसी आहेत.यू डी आय एस इ आणि केंद्र सरकारने जारी केलेल्या आकडे वारीत ३३ टक्के ओबीसी दाखवण्यात आलेत.'गोखले इन्स्टीट्यूट'ने केलेल्या ओबीसींच्या गणनेमध्ये हेच प्रमाण तब्बल ४८.६ टक्के आढळून आले होते.केंद्र सरकारच्या जनकल्याण विभागाने काढलेली ओबीसींची आकडेवारी ३३.८ टक्के आहे. राष्ट्रीय कुटुंब आरोग्य सर्वेक्षणा नुसार शहरी भागात २४.७ टक्के आणि ग्रामीण भागात २७.८ टक्के ओबीसी आहेत. निवडणूक आयोगाकडे तयार झालेल्या मतदार याद्यांनुसार राज्यात ३७ टक्के ओबीसी आहेत.सुधारणा कायदे आणि अनुकूलन आदेशांची यादी रद्द करणे आणि सुधारणा कायदा, १९४९ (१९४९ चा ४०) जनगणना (सुधारणा) कायदा, १९५० (१९५० चा ५१) अनुकूलन कायदे आदेश, १९५० कायद्यांचे अनुकूलन (क्रमांक ३) आदेश, १९५६जनगणना (सुधारणा) कायदा, १९५९ (१९५९ चा २२).रद्द करणे आणि सुधारणा कायदा, १९७४ (१९७४ चा ५६) याचाही गांभीर्याने विचार होणे गरजेचे आहे.२०११ च्या जनगणनेनुसार भारताची लोकसंख्या १,२१०,८५४,९७७ होती.२००१ पासून भारताने १८१.५ दशलक्ष लोकसंख्या जोडली,जी ब्राझीलच्या लोक संख्येपेक्षा थोडी कमी आहे. जगाच्या पृष्ठभागाच्या २.४% क्षेत्रासह भारताची लोकसंख्या १७.५% आहे.२०११ ची भारताची जनगणना किंवा १५ वी भारतीय जनगणना दोन टप्प्यात करण्यात आली, घरांची यादी आणि लोकसंख्या गणना. घरांची यादी करण्याचा टप्पा १ एप्रिल २०१० रोजी सुरू झाला आणि त्यात सर्व इमारतींबद्दल माहिती गोळा करण्यात आली. पहिल्या टप्प्यात राष्ट्रीय लोकसंख्या नोंदणी (एनपीआर) ची माहिती देखील गोळा करण्यात आली, ज्याचा वापर भारतीय विशिष्ट ओळख प्राधिकरणाद्वारे सर्व नोंदणीकृत भारतीय रहिवाशांना १२-अंकी अद्वितीय ओळख क्रमांक देण्यासाठी केला जाईल. दुसरा लोकसंख्या गणना टप्पा ९ ते २८ फेब्रुवारी २०११ दरम्यान करण्यात आला. १८७२ पासून भारतात जनगणना होत आहे आणि २०११ मध्ये पहिल्यांदाच बायोमेट्रिक माहिती गोळा करण्यात आली. ३१ मार्च २०११ रोजी प्रसिद्ध झालेल्या तात्पुरत्या अहवालांनुसार, भारतीय लोकसंख्या १७.७०% च्या दशकीय वाढीसह १.२१ अब्ज झाली. प्रौढ साक्षरता दर ९.२१% च्या दशकीय वाढीसह ७४.०४% पर्यंत वाढला. जनगणनेचे ब्रीदवाक्य होते असेही त्यांनी नमुद करून आमची जनगणना, आमचे भविष्य . भारताच्या तत्कालीन महामहीम राष्ट्रपती प्रतिभा ताई पाटील जनगणना आयुक्त सी. चंद्रमौली यांच्या कडून २०११ च्या जन गणनेचा अहवाल स्वीकारला.सर्वाधिक लोकसंख्या असलेले राज्य उत्तर प्रदेश १९९,८१२,३४१सर्वात कमी लोकसंख्या असलेले राज्य सिक्कीम (६१०,५७७)अनुसूचित जाती२०१,३७८,३७२अनुसूचित जमाती १०४,५४५,७१६२०११ च्या भारताच्या जनगणनेला समर्पित टपाल तिकिट २८ राज्ये आणि ८ केंद्रशासित प्रदेशांमध्ये पसरलेल्या या जनगणनेत ६४० जिल्हे, ५,९२४ उपजिल्हे, ७,९३५ शहरे आणि ६,००,००० हून अधिक गावे समाविष्ट होती. एकूण२.७ दशलक्ष अधिकाऱ्यांनी ७,९३५ शहरे आणि ६,००,००० गावांमधील घरांना भेटी दिल्या आणि लोकसंख्येचे लिंग, धर्म, शिक्षण आणि व्यवसाया नुसार वर्गीकरण केले. या अभ्यासाचा खर्च अंदाजे २,२०० कोटी होता अशी अत्यंत महत्वाची माहिती पीपल्स फोरम फॉर सोशल कॉजचे सचिव डॉ राजेंद्र दाते पाटील यांनी दिली.

## डॉ. प्रभाकर शेळके यांना अंकुर साहित्य संघाचा नाट्यलेखन पुरस्कार जाहीर



**जालना :** येथील जेष्ठ साहित्यिक कवी, कथाकार, नाट्यलेखक डॉ प्रभाकर शेळके यांच्या 'राजकरण घुसलं घरात'अर्थात खुंदळा-खुंदाळी या ग्रामीण नाटकास अंकुर साहित्य संघाचा पुरस्कार अंकुर साहित्य संघाचे केंद्रीय अध्यक्ष कवीवर्य हिंमत ढाळे यांनी जाहीर केला.

अंकुर साहित्य संमेलन पातुर जि.आकोला येथे ११मे रोजी पुरस्कार वितरण आहे.संमेलनअध्यक्ष मा.तुळशीराम बोबडे,मा.सुरेश लांडे गोदा प्रकाशनांचे प्रकाशक व मराठवाडा साहित्य परिषदेचे कार्यवाह गुरुवर्य डॉ दादा गोरे, प्रशासकीय अधिकारी डॉ.बी.आर.गायकवाड,कवी कैलास भाले,मनीष पाटील, संतोष तांबे, रेखा बैजल कल्याण सोळुंके, प्रा.बसवराज कोरे, डॉ.संजीवनी पंडित तडेगावकर, डॉ.श्रीनिवास सातभाई, प्रकाश जायभाये भगवान गीते, डॉ.यशवंत सोनुने, विश्वनाथ गायकवाड रामदास भारूडकर, सुखदेव सपकाळ अनिरुद्ध पावसे भगवान सवळे जालिंदर बटुळे रमेश नाईक नारायण खरात डॉ सुहास सदावृते, बाबासाहेब ताठे, किशोर राऊत, अरुण काफरे, शफिक सय्यद, इ. मान्यवरांनी शेळके यांचे अभिनंदन केले.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), मंगळवार ०६ मे २०२५


## विमलाबाई जगत्पुरिया यांना श्रद्धांजली



**छत्रपती संभाजीनगर** :- येथील एकता मंच मित्र मंडळ, म्हाडा कॉलनी यांच्यावतीने विमलाबाई डी. जगत्पुरिया यांना भावपूर्ण श्रद्धांजली देण्यासाठी श्रद्धांजली सभेचे आयोजन करण्यात आले. याप्रसंगी सीए चंद्रशेखर शर्मा, अश्फाकभाई कुरेशी, प्रा. माया वंजाळे-धोंगडे, डॉ.विनोद सिनकर आदींनी विमलाताई जगत्पुरिया यांच्या परिवाराबद्दल सहवेदना व्यक्त केल्या.

श्रद्धांजलीपर मनोगतात चंद्रशेखर शर्मा यांनी विमलाईविषयी कवी जगदीश देवपूरकर यांनी लिहिलेल्या काव्यरचनेचे वाचन केले. कवी जगदीश देवपूरकर ऑनलाईन भाषणात म्हणाले, की विमलाताई एक सुगरण होत्या, त्यांच्या धुळे येथील वास्तव्यात कवी नारायण सुर्वेसह अनेक मान्यवर साहित्यिकांनी त्यांच्या हातच्या सुग्रास भोजनाचा आस्वाद घेतला आहे.

डी.बी. जगत्पुरिया या आभाळाएवढ्या माणसाला सांभाळून परिवाराचीही काळजी घेणाऱ्या विमलाताई खऱ्या अर्थाने आदर्श सहचारिणी ठरल्या.

याप्रसंगी डॉ. यशवंत मनोहर, डॉ. श्रीपाल सबनीस, डॉ.सोमनाथ कोमरपंत (गोवा), डॉ.अनिल सूर्या (दिल्ली) उत्तम कोळगावकर, शोभा रोकडे(अमरावती), प्रा. रूपाली अवचरे, जोत्स्ना चांदगुडे (पुणे), जगदीश देवपूरकर(धुळे), डॉ.शत्रुघ्न जाधव, श्रीराम चव्हाण (नागपूर), डॉ.बाबूराव गायकवाड (कर्नाटक), कथाकार सुभाष आहिरे, प्रा.विलास वैद्य, प्रा. दामोदर मोरे यांसह अनेक दिग्गज लेखकांचे सांत्वनपर संवेदनशील दीर्घ शोकसंदेश प्राप्त झाल्याची माहिती विनोद सिनकर यांनी दिली. या श्रद्धांजली सभेला म्हाडा कॉलनीतील विनायक कळसकर, बाणदार, विवेक वाणी, डी.बी.जगत्पुरिया यांच्यासह बहुसंख्य रहिवाशी उपस्थित होते.


मराठवाड्यातील नं. १ चे डी.टी.पी.सेंटर

साहिल कॉम्प्युटर्स ॲण्ड प्रिंटर्स

डॉ.बा.आं.म.विद्यापीठ गेटजवळ, जयसिंगपुरा, औरंगाबाद.

मो. 8087880274, 8956362639, 9270446603, 9405109103

डी.टी.पी. (मराठी, हिंदी, इंग्रजी)

- प्रोजेक्ट रिपोर्ट
- डेझर्टेशन
- पीएच.डी./एम.फिल.थेसिस
- कलर प्रिंट
- डी.एड.,एम.एड.प्रोजेक्ट
- स्कॅनिंग
- स्पायरल व हार्ड बायडींग
- लॅमिनेशन

महाराष्ट्रातील सर्वच विद्यापीठाच्या 1300 पेक्षा जास्त पीएच.डी. 1500 एम.फिल., 4000 हून अधिक डेझर्टेशन्सचा अनुभव, कुशल ऑपरेटर्स, लाईट गेल्यास इन्व्हर्टरची सोय असलेले मराठवाड्यातील नं. 1 चे डी.पी.पी. सेंटर

अनुभव नसलेल्यांकडे जाऊन मानसिक व आर्थिक त्रास करून घेण्यापेक्षा.. अनुभवी ऑपरेटर्सकडून अचूक व उत्कृष्ठ कामासाठी अवश्यक संपर्क साधा.

Contact No.- 8956362639 / 8087880274

Email - sahilcomputer05@gmail.com


# महान दिशादर्शक व संशोधक हरवला



## माजी प्राचार्य डॉ. आर. के. क्षिरसागर यांच्या आदरांजली सभेचे आयोजन

**छत्रपती संभाजीनगर** : अभ्यासक, तत्वज्ञ, मितभाषी व कुणावरही कधीही न रागवणारा,महान संशोधक आता होणे नाही असे प्रतिपादन कालाकथित प्राचार्य डॉ आर के क्षिरसागर यांच्या स्मरणार्थ आदरांजली सभेत सर्वांनी आपल्या भावना व्यक्त केल्या.

डॉ बाबासाहेब आंबेडकर कला व वाणिज्य महाविद्यालयाचे माजी प्राचार्य व पिपल्स एज्युकेशन सोसायटीचे माजी सहसचिव आर के क्षिरसागर यांचे निधन १२ एप्रिल २०२५ रोजी झाले.त्यांच्या आदरांजली सभेचे आयोजन डॉ बाबासाहेब आंबेडकर सामाजिक अध्यायन संस्थेच्या वतीने डॉ बाबासाहेब आंबेडकर विधी महाविद्यालयात करण्यात आले होते.

या कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ संजय मुन होते. यावेळी प्रा.श्रीकिशन मोरे, प्राचार्य हिरोडे, डॉ प्रकाश शिरसाट, प्राचार्य इंद्रजित आल्टे, योगीराज बागुल, न्यायाधीश चावरे यांनी आर के क्षिरसागर यांच्या विषयी आपल्या भावना व्यक्त करून आठवणी सांगितल्या व आता त्यांच्या सारखा संशोधक पुन्हा निर्माण होणार नाही असे प्रतिपादन केले.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ प्रज्ञा साळवे यांनी केले तर आभार डॉ गजानन गजभिये यांनी मानले.या कार्यक्रमासाठी माजी न्यायमूर्ती डी आर शेळके, माजी प्राचार्य जाधव, माजी प्राचार्य भालेराव, माजी प्राचार्य जगताप, क्षिरसागर कुटुंबातील सर्व सदस्य व नातेवाईक, शहरातील नामवंत व्यक्तीमत्व मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.


डॉ.दत्ताभाऊ पाथ्रीकर शिक्षण प्रसारक मंडळ संचलित

मातोश्री डॉ.कंचन शांतीलालजी देसरडा पॅरामेडिकल कॉलेज.



बहुउद्देशीय आरोग्य कर्मचारी (MPW), आरोग्य निरीक्षक, आरोग्य पर्यवेक्षक, स्वच्छता निरीक्षक या पदासाठी आवश्यक असलेला शासनमान्य

Sanitary Health Inspector

सॅनेटरी हेल्थ इन्स्पेक्टर

या कोर्ससाठी प्रवेश चालु आहेत

बीबीका मकबऱ्याच्या मागे, हनुमान टेकडीजवळ,पहाडसिंगपुरा, छ.संभाजीनगर (औरंगाबाद.)

9405109103
8830838903

महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), मंगळवार ०६ मे २०२५

# यात्रा माझ्या गावाची

बालपणाच्या या गोष्टी मनावर अजूनसुद्धा अधिराज्य गाजवून आहेत. त्यातली प्रमुख गोष्ट म्हणजे आमच्या गावची 'जत्रा', पूर्वी असा एकही चित्रपट असायचा नाही कि ज्यामध्ये जत्रेचा सीन नसेल,तिथे चित्रपटाची कथाच गावच्या जत्रे भोवती फिरायची.पूर्वीच्या काळी करमणुकीची कुठलीही साधने नसल्याने जत्रेला अनन्यसाधारण महत्त्व होते.किंबहुना वर्षातून एकदा भरणारी गावची जत्रा अबालवृद्धाचे खास आकर्षण असायचे.वर्षभरातील कष्टाचा संसाराचा रहाटगाड्याचा तान या जत्रेतूनच कमी व्हायचा. ही जत्रा खऱ्या अर्थाने ग्रामीण भागातील शेतकऱ्यांचीअसते, असे म्हटले तर वावगे ठरणार नाही.बारामहिने कामात असणा-या शेतकरी व काबाड कष्ट करणा-यांना त्यातून थोडा दिलासा म्हणून जत्रेकडे बळीराजा पहात असतो.त्याकाळी नातेसंबंध, आपुलकी, प्रेम, जिव्हाळा, मैत्री, विश्वास या साऱ्या गोष्टी या इथे पाहायला मिळायच्या. इथे गरीब-श्रीमंत कुठलाही भेदभाव पाळला जात नसे. सगळं वातावरण कसं आनंदी होऊन जायचं. जत्रेच्या निमित्ताने सर्वगावकरी मंडळी एकत्र येत, थट्टा -मस्करी, गप्पागोष्टी होत, असे मनोरंजन होते. भजन-कीर्तन, भारुड, भागवत कथा, तमाशा, लावणी, दिंडी, पालखी अशा अनेक कलेचे सादरीकरण होत असते. अशा कार्यक्रमातुन अध्यात्मीक ज्ञानात भर पडत असते. सर्व मंडळीच्या मनावर अध्यात्मीक संस्कार होत असतात. जत्रेमधे गमतीदार खेळ खेळले जायचे, शर्यती पाहायला मिळायच्या, काही जत्रेमधून धार्मिक कारणां बरोबरच, आर्थिक वव्यावहारिक उलाढालीसाठी सोयीचे केंद्रही जत्रा असते. कधी राजकारण, तर कधी समाजकारणाचेही रंग या जत्रेतून दिसून येतात. जत्रेत हौसे, गवसे, नवसे जातात. एक जत्रेत फिरायचे, नवीन काही पाहायची हौस म्हणून येणारे हौसे, दुसरे जत्रेत काही गवसतेका म्हणून येणारे गवसे आणि तिसरे म्हणजे देवाला अनेक कारणासाठी नवस बोलणारे नवसे.यानुसार आम्ही पहिल्या वर्गातील म्हणजेच हौसे म्हणून जत्रेला जाणारा पैकी असायचो. संजीवन समाधी म्हणजे एका व्यक्तीने स्वतःच्या इच्छेने, खोल ध्यान अवस्थेत प्रवेश करून, आपल्या शारीरिक देहाचा त्याग करणे. याला अनेकदा 'जिवंत समाधी' देखील म्हटले जाते, कारण व्यक्ती जिवंत असतानाच या अवस्थेत प्रवेश करतो. संजीवन समाधी घेणाऱ्या व्यक्तीचा आत्मा आणि शरीर हे एका विशिष्ट स्थितीत प्रवेश करतात, जिथे ते पूर्णपणे विलीन होतात. असे संजीवन समाधिस्त श्री घाळेप्पा स्वामीची किर्ती व ख्याती पंचक्रोशीमधे प्रसिद्ध आहे. आमचे आजी आजोबा सांगायचे ज्या वेळी श्री घाळेप्पा स्वामी महाराज जिवंत समाधी घेतली व पुर्ण एक वर्षानंतर जेव्हा त्यांची समाधी काढण्यात आली तेव्हा त्यांचा डावा डोळा ऊघडा होता व समाधी मधे लावलेला दिवा एक वर्षानंतरही तेवत होता असे ते सांगत असत. यावरुन त्यांची अध्यात्मीक एकरुपता व त्यांची देवरुपता लक्षात आल्याशिवाय रहात नाही. श्री घाळेप्पा स्वामी महाराज श्रावण महिन्यात अनुष्ठाण करायचे. अनुष्ठाण करत असताना ते फक्त पुर्ण श्रावण महिना बेलपत्री खाऊनच अनुष्ठाण करायचे म्हणुनच आजही दर सोमवारी श्री घाळेप्पा स्वामी महाराजाना साखर, दुध व दुधाची दशमी हाच नैवैद्य चालतो. सोमवारी कोणताही मोठा सण असेल पुरण पोळी बनवली असेल तरी श्री घाळेप्पा स्वामी महाराजाना दुधातील दशमी किंवा दुध साखर हाच नैवैद्य दाखवला जातो व ती परंपरा आजही पाळली जाते.माझ्या मनात सुद्धा जत्रेच्या खूप आठवणी ताज्या आहेत. माझ्या गावची म्हणजेच "आतनूर" तालुका उदगीर हल्ली तालुका जळकोट येथील 'श्री काशी विश्वनाथ महाराज व श्री संजीवन समाधी घाळेपा स्वामी महाराज' यांच्या नावाने भरणारी जत्रा हा एक मोठ्या प्रमाणात भरणारा उत्सवच असायचा. त्यामुळे काही लोक या जत्रेला 'उत्सव' यानावाने संबोधतात. हा उत्सव दोन दिवस असायचा, गावातील उत्सवाची नुसती तारीख जवळ आली तरी, गावातील प्रत्येक व्यक्तीच्या चेहऱ्यावर आनंदाची लहर चमकलेली दिसत असे. अनेक नाते वाईक मित्र मंडळी या जत्रेच्या निमित्ताने एकत्र यायचे. घरातील वयस्कर मंडळी आपापली लेक, जावई, सुना, नातवंड येणार म्हणून वाट पाहत असायची. या कालावधीत घरातील सगळ्या स्त्रियांची धावपळ उडायची, गावातल्या प्रत्येक घरात सडा-सारवण, रांगोळी यांचा झगमगाट असायचा. पाहुणे मंडळी येणार म्हणून स्वच्छता ठेवली जायची. घराघरात पुरणपोळी, आमरस, खीर, भजी, कुरडयायांचा समावेश असलेले सुग्रास भोजन तयार व्हायचे. गावातील महत्वाच्या ठिकाणी व मंदिरावर रंगरंगोटी, विद्युत रोषणाई केली जात असे. उत्सवाच्या कामात चढा ओढीने भाग घेण्यास सर्व समाजातील तरुणांची जणू स्पर्धाच लागलेली असायची. उत्सवाच्या दिवसात सकाळीच कोणीही न उठवता आपोआप जाग यायची. लवकर-लवकर तयार होऊन बसायचो, कधी एकदा उत्सवात जातो, असं व्हायचं. जत्रेत कायकाय घ्यायचं, त्याचा तगादा आईच्या मागे लावायचा. कधी-कधी तिथे गेल्यावर दुसऱ्या वस्तू पाहून मन बदलायचं. मग कशी बशी मनाची समजूत काढून शांत बसायचं.भंडारा'भंडारा' किंवा 'परू 'म्हणजे गावातील उत्सवा निमित्त काल्याच्या पहिल्या दिवशी परिसरातील सर्व गावे व तांड्यातील आबाल वृद्धांसहस गळ्यांना महाप्रसादाचे जेवण, या दिवशी परिसरातील सर्व लोक महाप्रसादाचे जेवण घेण्यासाठी एकत्र आमच्या गावी येत असत. हा प्रसाद म्हणजे गव्हाची खीर, वरण व भात, तोही येथेच्छ, असे. गव्हाची खीर बनवण्यासाठी गहू कांढून घ्यावे लागत, चार क्विंटल गव्हाची खीर म्हणजे चार कलई भरून खीर.ही खीर बनवण्यासाठी लोखंडाच्या मोठ्या कलया होत्या, एका कलईत एक पोते गव्हाची खीर बनवली जायची. त्यात खोबरे, इलायची, गुळ यांचा मेळ घालून खीर बनवली जायची. ही खीर म्हणजेच 'महाप्रसाद' म्हणून सर्व भक्तांना जेवणाच्या स्वरूपात देण्यात येत असे. हा प्रसाद घेण्यासाठी परिसरातून, गावा गावातून वाडी, तांड्यातून व आमच्या गावातून लहानथोर मंडळींसह सर्वांची गर्दी असायची. त्याकाळी आज सारखे जारचे पाणी वापरले जात नव्हते. आमच्या 'तिरु नदीचे' वाहते पाणी लोखंडाच्या बॅरलमध्ये भरून ठेवले जायचे. तेच पाणी स्वयंपाकाला, पिण्यासाठी व इतर वापरासाठी वापरले जात असे. जवळपास चार-पाच हजार लोक गावात येणार म्हणून आमचे आजोबा कैलासवासी शंकराप्पा पंचगल्ले' आम्हाला घरातील सर्व साठवण्याचे हौद, घागरी, भांडे व्यवस्थित धुऊन नदीचे पाणी घागरीने खांद्यावर आणून पाणी भरा, असा संदेश देत असत. कारण त्या काळी गावात बोअर, विहीर, नळाची पाईप लाईन ही साधने उपलब्ध नव्हती. धुण्यासाठी, जनावरासाठी, पिण्यासाठी एकच नदीचे पाणी उपलब्ध असे. 'तिरु 'नदीला कधी-कधी दुष्काळ पडल्यानंतर कोरडी व्हायची, अशावेळी आमचे आजोबा शंकरपा पंचगल्ले ते हे नदीमध्ये लाकडी खोके, पिंपे वाळूत रुतवत असत व त्यातली वाळू बाजूला काढले की झऱ्याचे स्वच्छ पाणी भरून येत असे. त्याकाळी लाईटची सोयही असली तरी तेवढ्या प्रमाणात नव्हती .मग आम्ही पाणी घागरीत भरत असू आणि भरलेली घागर खांद्यावरून घरी आणत असू. असे हे सर्व गावातील स्त्री-पुरुष लहान-थोर मंडळी सगळेजण करत असत. आता जशी रॉकेलला, बँकेला रांग लागते, तशी नदीतील पाण्याला कधी रांग लागलेली नसे. कारण, वाळूत रुतवलेले डबे, बॅरल, लाकडी खोके एक-दोन नसायचे तर ते पंधरा-वीस असायचे, त्यामुळे जिथे डबा, बॅरल, खोका रिकामा आहे तिथे जाऊन घागरीत पाणी भरून घ्यायचे. आज प्रत्येक गोष्टीत रांगा लागतात तेव्हा या गोष्टीची आठवण झाल्याशिवाय राहत नाही. त्याकाळी एकमेकाबद्दल प्रेम-भावना होती. कधी कुणाची अडचण असेल तर ती सोडवणे, त्याला मदत करणे अशी भावना असायची. परिसरातून येणारे लोक रिकाम्या हाताने प्रसाद घेण्यासाठी यायचे, तेव्हा त्यांना पळसाच्या पानापासून बनवलेल्या पत्रावळीवर प्रसाद वाढायचा. प्रसाद पूर्ण खाल्यानंतर ते पाणी पिण्यासाठी मात्र आमच्या घराकडे वळायचे . तेव्हा आम्ही आमच्या घरात साठवलेले पाणी पिण्यासाठी आवर्जून देत असू, व तसा आजोबाचा आग्रही असायचा. प्रसादासाठी मंदिरा पासून ते आमच्या घरापर्यंत दोन्ही बाजूने रांगा लागायच्या. वाढपी प्रत्येकाला आग्रहाने खीर-खीर असे ओरडत आग्रहाने वाढायचे. कुणालाही कमी पडणार नाही, याची काळजी घेतली जायची. आम्ही फक्त पाणी वाढण्याचे काम करत असू.उत्सवगावात उत्सवाची तयारी करण्यासाठी गावातील पुढारी माणसे एकत्र येऊन उत्सवात काय-कायकार्य क्रमकरायचे, त्याचे नियोजन करण्यासाठी' श्रीकाशी विश्वनाथ महाराज'व'श्री घाळेप्पा स्वामी महाराज यांच्या मंदिरावर एकत्र येत असत. प्रत्येक जण आपआपल्या मनातील विचार मांडत असे. या उत्सवात कोणकोणती कार्यक्रम करायचे, कोणकोणते महाराज कीर्तनासाठी बोलवायचे, त्यांना निमंत्रण देण्यासाठी कोणास पाठवायचे, उत्सवात कायकाय कामे करावी लागणार, व टी कोणा कडून करून घ्यायची, त्यांची जबाबदारी त्यांना सोपवून द्यायची, अशी चर्चा होत असे. गावोगावीचे महाराज बोलावणे, त्यांना निमंत्रण देणे, यांचा समावेश असे. त्याकाळी आजच्या सारखी सोशल मीडियाची सोय उपलब्ध नव्हती.गावा मध्ये श्री काशी विश्वनाथ महाराजांचे मंदिर लागूनच घाळेप्पा स्वामी महाराजांचे मंदिर व मध्यभागी श्री हनुमाना चे मंदिर हे जवळ जवळ आहेत. या सर्व मंदिरांची स्वच्छता करणे, रंगरंगोटी करणे, दुरुस्ती करणे अशी कामे प्रामुख्याने अगोदर करावी लागत असत. त्यात रंगरंगोटी मध्ये आमचे सर्व कुटुंब सहभागी होत असे. आमचे आजोबा कैलासवासी शंकराप्पा पंचगल्ले हे कलाकार होते. गावच्या पंच मंडळात त्यांचा सहभाग असे. दिलेले काम चोख व ते पार पाडण्याचा त्यांचा आग्रह असे. आम्ही त्यांना आप्पा असे संबोधत. आमच्या अप्पांना वेशभूषा, रंगभूषा, हस्तकला इत्यादी सारखे गुण अंगी होते. गावात मंदिरावर रोषणाई करणेसाठी त्याकाळी रंगीत कागद वापरले जाई. त्याला'ताव'म्हणत. अशा कागदाचे वेगवेगळ्या आकाराचे, वेगवेगळ्या डिझाईनचे आकर्षक असे कागद कापून गव्हाच्या पिठापासून बनवलेल्या खळीने, सुतळीला चिटकवून लांब फरारी तयार करण्याची कला, आमच्या आजोबांच्या अंगी होती. ते काम त्यासाठी मोठ्या आनंदाने करत असत. तसेच त्याकाळी लाईटची सोय नसल्यामुळे, रॉकेलवर चालणाऱ्या पेट्रोमॅक्स होत्या, त्यांना आम्ही'बत्ती'असे म्हणतअसु. त्यावेळी त्यांना चालण्यायोग्य दुरुस्त करण्याची जबाबदारी ही आमच्या कुटुंबाकडे असायची. तीम्हणजे आमचे काका शिवराजप्पा पंचगल्ले यांना मिळत असे. बत्ती सदुरुस्ती चे काम त्याची नवजर, मेंटल,वायसर, हुबाब त्याचा समावेश होतो असे मेंटल म्हणजे एक कापडी जाळीदार वस्तू पासून बनवलेले असते. जे की वायसर हे कातडी पासून बनवलेले असते हुबाब हा प्रकार आता अस्तित्वात नाही. हुबाबब म्हणजे काचेच्या पट्ट्या एका लोखंडी साच्यामध्ये अडकवून-अडकवून गोल असा आकार केलेला असायचा, आणि हा हुबाब त्या बत्तीच्या प्रकाश देणा-या जाळी भोवती ठेवला जायचा जेणे करून वाऱ्या पासून संरक्षण होईल व ते वाऱ्यापासून सुरक्षीत राहील. काही काळ चालल्या नंतर बत्ती बंद पडणार नाही, याची काळजी घेण्याची जबाबदारी आमच्या काकावरच असे. त्यासाठी ते एका डब्यात रॉकेल साठवून ठेवत असत. नंतर काळ बदलला तसे गावात लाईटची सोय होत गेली, मग लाईटची ही कामे करण्याची जबाबदारी माझे लहान काका बाबुराव पंचगल्ले त्यांच्याकडे असायची. मंदिरात बल्प, ट्युबलाईट, पंखे लावणे त्यासाठी लागणारे साहित्य वायर, होल्डर बल्प व रोशनाई साठी लागणारी साधने इत्यादी कामे करत असत. मंदिरातील रंगरंगोटीच्या कामात ही आमच्या घराण्यातील सर्वांचा सहभाग असे. माझे वडील वैजनाथप्पा पंचगल्ले हे एक उत्तम कलाकार, उत्तम शिक्षक, उत्तम फोटोग्राफर, उत्तम वक्ते,उ त्तम पेंटर, उत्तम व्यंगचित्रकार व नकलाकार असे हरफन मौलासारखे सर्व गुण संपन्न व्यक्तिमत्व. प्रत्येक गोष्टीत जिज्ञासूपणा, नवनवीन गोष्टी माहीत करून घेण्याची वृत्ती, खोटेपणाचा तिरस्कार, चांगले संभाषण कौशल्य असणारे पट्टीचे शिक्षक..मंदिरावरील व इतर गावातील पेंटिंगची कामे म्हटले की ते कोणताही मोबदला न घेता काम करून देणे, हीच सेवा वृत्ती त्यांच्या अंगी आहे. त्यांच्या अंगी ब्लॅक अँड व्हाईट फोटोग्राफीके गुण, रोलच्या कॅमेऱ्याद्वारे काढलेले फोटो डेव्हलप करणे म्हणजेच काढलेल्या निगेटिव फिल्मवरून फोटो तयार करणे हे स्वतः चांगल्या पद्धतीने करत असत. त्यानंतर कलर फोटोग्राफी मध्ये सुद्धा त्यांचा हात कुणीही धरू शकत नाही. ब्लॅक अँड व्हाईट फोटोला कलर मध्ये रुपांतरीत करण्याची कला त्यांच्या अंगीआहे. गावातल्या वेगवेगळ्या कार्यक्रमां मध्ये त्यांचा सहभाग नाही असा कुठलाच कार्यक्रम सांगता येत नाही.शिमग्याला टिपरे खेळले जात असत. तेव्हा रंगभूषा व वेशभूषा त्यांच्या शिवाय कुणी ही करू शकत नाही. त्यांचे विद्यार्थी आजही मोठ्या पदावर काम करत आहेत, हे आवर्जून सांगावे लागते. शाळेमध्ये साजरे करण्यात येणारे सण ,त्या सणावर आधारित कार्यक्रम वडीलांशिवाय होतच नसे. गावातील मनोरंजनाचे कार्यक्रम, शाळेतील शिक्षकांचे योगदान खूप मोठे होते. त्यात कोनाळे गुरुजी, मुडपे गुरुजी, हेळंबे गुरुजी, रोडगे गुरुजी, बिचकुंदे गुरुजी, तोडकर गुरूजी यांचे मोलाचे योगदान आहे.आनंदगावा मध्ये उत्सवा निमित्त प्रत्येक जण आनंदी असायचा. घरात पै-पाहुण्यांची वर्दळ असायची. परिसरात अनेक गावातून भक्त मंडळी किर्तन, भजन, भारुड ऐकण्यासाठी यायची.काही जण आपल्या अंगी असलेल्या भक्तिमय गुण सादर करत असत. शेजारचे मौजे गव्हाण.मेवापूर,चिंचोली,मरसांगवी,रावणकोळा,नांदेड जिल्ह्यातील मौजे हातराळ,गुंडोपंत,दापका बाराळी, येथून भक्तगण उत्सवा निमित्त हजर राहत असत. ज्यांना कीर्तना मध्ये अभंग गाता येतअसे ते कीर्तनाच्या कार्यक्रमात ,ज्यांना भारुड म्हणता येते किंवा सादर करता येतं ते संध्याकाळच्या भारुडाच्या कार्यक्रमात, ज्यांना तबला,पेटी,मृदंग वाजता येत,ते त्यात्या कार्यक्रमात हजर असत. ज्यांना फक्त टाळवाजता येते व त्यांना साथ देता येते टाळकरी म्हणून हरिपाठ व कीर्तनास उभे राहात असं.ज्यांना काहीच येत नाही ते ऐकण्यासाठी श्रोते म्हणून हजर राहत असत. वैशाख शुद्ध प्रतिपदेला सप्ताह उभा राहतो.प्रत्येक जण मंदिरात आल्यानंतर श्री काशी विश्वनाथ महाराज श्री घाळेप्पा स्वामी महाराज व हनुमान मंदिर येथे मनोभावे माथा टेकवतो. बेल, फुल, श्रीफळ घेऊन येतो, कुणी साखर, उदबत्ती घेऊन येतो, कुणी घरी केलेल्या गोडा धोडा चे नैवेद्य घेऊन येतो, पण माथा न टेकता प्रत्येकाचे समाधान होणारच नाही. उत्सवासाठी बाहेर गावी कामा निमित्य गेलेले मंडळी आवर्जून आपल्या बाया-पोरासकट हजर असतात. कुणी आपापल्या लेकी, पोरा-बाळांना आमंत्रित करतात. त्यामुळे गावा मध्ये एक आनंदी वातावरण निर्माण होते.मंदिरावर नेमून दिलेले व्यवस्थापक आपापली कामे पार पाडण्याचा आटोकाट प्रयत्न करत असत. पहाटे ज्ञानेश्वरी पारायण, सकाळी हरिपाठ, दुपारी चार वाजता विश्राम. नेमून दिलेल्या अन्नदात्याच्या घरीमहाप्रसाद,पुन्हा संध्याकाळी हरिपाठ, रात्री कीर्तन व भारुड असा पूर्ण आठ दिवसाचा भरगच्च असा कार्यक्रम आखला जातो व त्या प्रमाणे सर्वतोपरी प्रयत्न केले जातात. आता एवढा मोठा कार्यक्रम म्हटल्या नंतर आर्थिक बाजूही महत्वाची असते. यासाठी' श्री काशी विश्वनाथ महाराज मठ संस्थान' चे विश्वस्त म्हणून कार्य करणारी मंडळी गावातील प्रत्येक घराला काही देणगी देण्याचे आव्हान करतात.आपापल्या कुवतीनुसार प्रत्येक जण देणगी देऊन कार्यक्रम कसा चांगल्या पद्धतीने, निर्विघ्न पणे पार पडेल यासाठी आग्रही असत. या विश्वस्ता मध्ये आमच्या आजोबा चे मित्र गावचे पाटीलश्री माधवराव पाटील, श्री गोविंदराव पोलीसपाटील, श्री विठ्ठलराव पाटील,श्री व्यंकटराव पाटील तात्या ,सरपंच व्यंकटराव येवरे, संग्राम शेटकर,नामदेवराव पाटील, संग्राम कल्पे, गुरुनाथ कापसे, बळीराम पत्तीवार ,गोविंदराव शिंदे, संगमनाथ, संगेवार रामराव कदम, नारायणदेव, इत्यादीची प्रामुख्याने नावे घ्यावी लागतात.नवस'श्री घाळपा स्वामी महाराज' हे एक जागृत देवस्थान म्हणून नवसाला पावणारे म्हणून प्रसिद्ध आहे.श्री घाळप्पा स्वामी महाराज यांनी जिवंत समाधी घेतल्याचे आमचे आजोबा सांगत असत व त्यांच्या भक्तिमय आठवणीही सांगत असत. आजूबाजूच्या गावातून लांबून-लांबून भाविक महाराजांच्या दर्शनासाठी येतात. नवसाला पावणारे महाराज असल्यामुळे, त्यांची संगमरवराच्या दगडरुपी महादेवाच्या पिंडीला तांदळाचा भात' लिंपण' एक हा प्रकार फार पूर्वीपासून नवस पूर्ण करण्याच्या प्रकारांमध्ये प्रामुख्याने येतो. मंदिरा मध्ये छताला एका ठिकाणी चौकोनी जागा सोडली आहे, त्यातून लहान मुलांना खाली टाकले जाते व काही मंडळी खालच्या बाजूला त्या मुलांना कपड्यांमध्ये झेलतात. अशा प्रकारे नवस फेडला जातो. भक्ती करणाऱ्याला श्री घाळेप्पा स्वामी पावतातच व अशी धारणा आहे व भक्ताचा विश्वास आहे.अर्थपरिसरात बेंड-बत्तासे, पेढे, मिठाई, लाह्या, नारळ, फुले, उदबत्ती इत्यादी चे दुकाने थाटली जात असत. गावात प्रत्येक घरांमध्ये उत्सवासाठी चे खर्चाचे नियोजन पूर्ण वर्षभर केलेलेअसत. विविध प्रकारची खेळणी, ज्योतिषी, शोभेच्या वस्तूची दुकाने मोठ्या प्रमाणावर येत असत. हॉटेल मध्ये गरमागरम भजी, शेव, पापडी इत्यादीची दुकानेही मोठ्या प्रमाणात असत. त्याकाळी काही मंडळी खरेदीसाठी उत्सवाचा मुहूर्त गाठत असत. त्याकाळी उत्पन्नाचे साधन म्हणजे शेती व शेतीवर अवलंबून असणारे छोटे उद्योग, उत्पन्न फार कमी प्रमाणात असायची. डोंगराळ प्रदेश असल्यामुळे सुपीक जमिनीचे प्रमाण फार कमी आहे. कधी जास्त पाऊस तर कधी कोरडा दुष्काळ, अशा परिस्थितीत हातात येणारे उत्पन्न व खर्चाचा मेळ बसायचा नाही. त्यामुळे खरिपाच्या उत्पन्नावरच पूर्ण वर्षाच्या खर्चाचा मेळ लावणे आवश्यक असायचे. दळणवळणाची साधने मुबलक प्रमाणात उपलब्ध नसल्यामुळे तालुक्याला जाऊन खरेदी करणे शक्य नसल्यामुळे, बाया-बापड्याची कपडे, भांडे, बांगड्या खरेदीसाठी झुंबड उडत असे. या मधून ग्रामीण अर्थव्यवस्थेला चालना मिळण्यासाठी हातभार लागतअसे.या सात दिवसात धार्मिक कार्यक्रमांची मेजवानीच असते. या सात दिवसात किर्तन, भजन, हरिपाठ, ज्ञानेश्वरी पारायण, इत्यादी कार्यक्रम होत असत. सप्तमी दिवशी सकाळी पालखी गावातील मुख्य रस्त्यावरून निघते. पालखी मध्ये दिवट्याचा मान एका समाजाला, भालदार-चामान एका समाजाला दिला,चोपदार-चा मान एका समाजाला दिलाजातो.पालखी मध्ये सर्व लहान थोर मंडळी येतात.ही पालखी लेझीमच्या तालावर, टाळ मृदंगाच्या निनादात, गावप्रदक्षिणेसाठी निघते.प्रत्येक जण सडा-सारवण,रांगोळी करून आपले अंगण स्वच्छ ठेवतो व पालखीचे स्वागत करतो.कुणीबेल-फूल वाहून स्वागत करतात,तर कुणी पालखीच्या खालून इकडून तिकडे जाऊनआशीर्वाद घेतात.कुणी फूगडीचा फेरा, धरत टाळकरी वेगवेगळ्या पद्धतीने नाचून टाळ वाजवत असतात. अशा पद्धतीने पालखी वाजतगाजत,टाळ-मृदंगाच्या निनादात पुन्हा मंदिर स्थळी येते. याच दिवशी दुपारी काल्याचे किर्तन होतअसते. गावातील सर्वांच्या घरातून एकत्रित केलेले दही व लाह्या एका मोठ्या माठात जमा करून ते हनुमान मंदिरावर असलेल्या झाडाला टांगले जाते व काल्याचे किर्तन संपत आल्यानंतर विणेकरी आपल्या विनेच्या साह्याने तो माठ फोडतो, तर काही मंडळी माठात हात घालून काल्याचा प्रसाद उंचावरून खाली थांबलेल्या जनसमुदायावर भिरकावतात. कित्येक जण कडक उन्हाळा असल्यामुळे उन्हापासून रक्षणासाठी छत्र्या आणलेल्या असत.त्या छत्र्या उलट्या धरून प्रसाद मिळवण्याचा प्रयत्न करत असत. हे विहंगम दृश्य नक्कीच पाहण्यासारखेच असायचे. सर्वांना एकत्र आणणार आणि एकरूप करणार या समुदायात गरीब-श्रीमंत स्त्री-पुरुष हे सर्वभेद विसरून एकरूप होऊन जात असत.



**प्रा.डॉ.सुधीर वैजनाथराव पंचगल्ले**
श्री माधवराव पाटील महाविद्यालय, मुरुम
वाणिज्य अभ्यास मंडळ सदस्य
डां.बा.आं.मराठवाडा
विद्यापीठ,छ.संभाजीनगर